**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, NOV-DEC, 2020, VOL- 8/62*

# शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांसाठी बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीचे विकसन

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Abstract**

*संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या विषयाला अनुसरून आवश्यक त्या माहितीचे संकलन करावे लागते. संशोधन विषयासाठी माहिती संकलनाची विविध साधने आहेत. या साधनांपैकी संशोधन विषयाचा विचार करून संशोधकास योग्य ते माहिती संकलन साधन निवडावे लागते. माहिती संकलन साधनाची अचूक निवड करण्यासाठी संशोधकास त्या साधनाच्या गुणदोषांची व मर्यादांची माहिती असणे आवश्यक असते. माहिती संकलन साधनाच्या निवडीवर संशोधनाची गुणवत्ता अवलंबून असते म्हणूनच संशोधकास माहिती संकलन साधन निवडताना योग्य ती खबरदारी घ्यावी लागते.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1) प्रस्तावना

बहुभाषिक शिक्षक असेल तर बहुभाषिकता हा गुण आपोआपच शालेय विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याची संधी मिळेल. थोडक्यात, शिक्षक 'बहुभाषिक' असावा अथवा त्याला मातृभाषा खेरीज अन्य भाषांची सामान्य ओळख तरी असावी आणि अभ्यासक्रमांतर्गत भाषेची जाणीव असावी म्हणून N.C.T.E च्या 2014 शिक्षक-प्रशिक्षण अभ्यासक्रम पुनर्रचनेत Language Across Curriculum या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे.

संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी आवश्यक व उपयुक्त साधन म्हणून पदनिश्चयन श्रेणीचा विचार करण्यात येतो. पदनिश्चयन श्रेणीमध्ये प्रश्न वा विधानाचे व्यवस्थित संकलन केलेले असते. त्याअन्वये शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांमधील बहुभाषिकतेच्या जागरूकतेच्या आढाव्यासंदर्भात संशोधकाने अपेक्षित घटकांची यादी केली व त्याची मांडणी सुगम पद्धतीने करण्यात आली. त्याचबरोबर विधानांची मांडणी करून त्यासमोर सुयोग्य पर्याय देण्यात आले. प्रस्तुत पदनिश्चयन श्रेणीची निर्मिती ही तज्ज्ञांशी चर्चा करून पथदर्शी अभ्यासानंतर पदनिश्चयन श्रेणीस अंतिम स्वरूप देण्यात आले.

## 2) माहिती संकलन साधन

### · पदनिश्चयन श्रेणी


Barr,Davis and Johnson, "Rating is a term applied to expression of opinion or judgement regarding some situation, object or character.Opinions are usually expressed on ascale of values."

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

माहितीच्या नोंदीचे पदनिश्चयन श्रेणी हे गुणात्मक साधन आहे .एखादया व्यक्तीमध्ये एखादा गुण किंवा वैशिष्ट्ये किती प्रमाणात उपलब्ध आहे हे समजून घेण्यासाठी या साधनाचा उपयोग केला जातो.
( भिंताडे, 2007 )

**3) पदनिश्चयन श्रेणी विकसनाची कार्यवाही**

खालील मुद्यांच्या आधारे, सुसंगत क्रमाने, संशोधकाने बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीचे विकसन केले.




**ओघतक्ता क्रमांक: 1 बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीचे विकसन**

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**4) पदनिश्चयन श्रेणीची उद्दिष्टे**

1. विद्यार्थी- शिक्षकांच्या प्राथमिक माहिती, अध्यापन पद्धती, अवगत भाषा, संख्या, इत्यादींची माहिती संकलित करणे.

2. बहुभाषिकतेविषयी माहित असणाऱ्या घटकांची सुव्यवस्थित मांडणी करणे.

3. बहुभाषिकतेविषयी आवश्यक घटकांची विधानासह मांडणी करणे.

4. पदनिश्चयन श्रेणी भरताना घ्यावयाची  काळजी याविषयी आवश्यक त्या सूचना देणे.

**5) पदनिश्चयन श्रेणी तयार करताना विचारात घेतलेले निकष**

1. विद्यार्थी- शिक्षकांची प्राथमिक माहिती.

2. विद्यार्थी- शिक्षकांची अध्यापन पद्धती.

3.विद्यार्थी- शिक्षकांचे भाषाज्ञान.

4. बहुभाषिकतेविषयक जागरुकता.

5. बहुभाषिकते विषयक जागरुकतेचे घटक आणि विधाने.

6. प्रत्येक विधानास पर्याय.

7. पर्यायातील बहुविविधता.

**6) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीचे घटक आणि विधाने**

बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी एकूण 175 गुणांची होती. त्यामध्ये भाषिक, साहित्यिक/ व्यवहारिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, व्यवसायिक अशा सात घटकांचा समावेश होता. प्रत्येक घटकावर पाच  अशी एकूण 35 विधाने समाविष्ट होती.

**7) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीच्या विधानासाठी पर्यायी प्रतिसाद**

प्रत्येक घटकावर पाच  अशी एकूण 35 विधाने समाविष्ट होती. प्रत्येक विधानासाठी नेहमीच, बहुदा, गरजेनुसार, क्वचित, कधीच नाही  असे पर्याय देण्यात आले होते. नेहमीच या पर्यायाखाली  √ अशी खूण केली असता पाच गुण देण्यात आले होते. बहुदा या  पर्यायाखाली  √ अशी खूण केली असता चार गुण देण्यात आले होते, गरजेनुसार या पर्यायाखाली √ अशी  खूण केली असता तीन गुण देण्यात आले, क्वचित या पर्यायात खाली  √ अशी   खूण केली असता दोन गुण देण्यात आले होते आणि कधीच नाही या पर्यायाखाली  √ अशी   खूण केली असता एक गुण देण्यात आला होता.

**8) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन  श्रेणीचे विकसन**

बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीची उद्दिष्टे, घटक, विधाने, विधानासाठी पर्यायी प्रतिसाद व गुण या सर्व मुद्द्यांचा विचार करून मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनानुसार संशोधकाने प्राथमिक

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

स्वरूपात, सात घटकांवर आधारित 35 विधाने असलेल्या, पाच बिंदूंच्या बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीचे विकसन केले.

**9) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीचा पथदर्शी अभ्यास**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक निर्मित बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीच्या पथदर्शी अभ्यासासाठी ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या 30 शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांकडून बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी भरून घेतली. बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी भरताना विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

**10) पथदर्शी अभ्यासातून प्राप्त माहितीवर आधारित तज्ञांशी चर्चा**

बहुभाषिकतेसंदर्भात विद्यार्थी- शिक्षकांच्या बहुभाषिकताविषयक जागरूकतेच्या

सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी संशोधकाने तयार केलेली बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी तज्ज्ञांकडून तपासून मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ते बदल करून पथदर्शी अभ्यासाकरिता उपयोगात आणली गेली, त्यात 30 विद्यार्थी शिक्षकांचा समावेश करण्यात आलेला होता, त्यांनी दिलेला प्रतिसाद व प्रत्याभरण याद्वारे घटकांची, विधानांची तपासणी करून तज्ज्ञांच्या व मार्गदर्शकाच्या सहाय्याने बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी या साधनाची संरचना व स्वरूप बदलण्यात आले.

**11) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीची पुनर्रचना**

प्रस्तुत संशोधनासाठी मार्गदर्शक, तज्ञांचे मार्गदर्शन, चर्चा तसेच पथदर्शी अभ्यासातून मिळालेल्या प्रतिक्रिया व सूचना यांचा विचार करून, बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करून बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीस अंतिम स्वरूप देण्यात आले.

**12) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीची आशय वैधता**

संशोधकाने तयार केलेली बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणी सप्रमाण आहे का ? हे तपासण्यासाठी संशोधकाने अंतर्गत सप्रमाणता मधील आशय सप्रमाणता तपासली. आशय सप्रमाणता म्हणजे ज्या उद्दिष्ट/ उद्देशासाठी चाचणी बनवली गेली तोच उद्देश व उद्दिष्ट अंतर्भूत घटकाद्वारे मापन केला जातो का? याची खातरजमा होय त्यास आशय वैधता / सप्रमाणता असे म्हणतात. (कदम आणि चौधरी 2011) त्याप्रमाणे संशोधकाने तयार केलेल्या बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीची आशय सप्रमाणता तज्ज्ञांकडून तपासून घेतली.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

ज्या संशोधन विषयाकरिता बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणी तयार करण्यात आली होती ती म्हणजे बहुभाषिकतेच्या सर्व घटकांचा समावेश आणि त्या घटकाचे पदनिश्चयन श्रेणीत विधानांच्या स्वरुपात प्रतिबिंब दिसते आहे की नाही, याकरिता बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीची आशय वैधता तपासण्यात आली, याकरिता संशोधकाने विकसित केलेली बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणी पाच तज्ज्ञांना दिली. तज्ज्ञांनी उद्दिष्टे, घटक, विधाने यांचा अंतस्थ संबंध, परस्परपूरक आशय मांडणी, आवश्यक बाबींचे मापन, विधानातून व्यक्त होणारा अर्थ, आदीं निकषांच्या साह्याने पदनिश्चयन श्रेणीची आशय वैधता तपासून दिली.

**13) बहुभाषिकता जागरूकता पदनिश्चयन श्रेणीची विश्वसनीयता**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधक निर्मित शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांची बहुभाषिकता जागरुकता तपासणाऱ्या सात घटकांवर आधारित पाच बिंदूंच्या बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीची विश्वसनीयता ठरविण्यासाठी चाचणी पुन: चाचणी पद्धतीचा वापर केला. बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी पथदर्शक अभ्यासाद्वारे निवडलेल्या प्रतिसादकांना पुन्हा तीच बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणी देऊन, प्राप्त झालेल्या माहितीची तुलना केली. चाचणी पुन: चाचणी पद्धतीने बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले. संशोधक निर्मित बहुभाषिकता जागरुकता श्रेणीचा सहसंबंध गुणक 0.78 म्हणजेच उच्चतम स्वरूपाचा असून विश्वसनीय आहे.

**विद्यार्थी शिक्षक बहुभाषिकता जागरुकता पदनिश्चयन श्रेणी**

प्रस्तुत पदनिश्चयन श्रेणी ही शिक्षणशास्त्र विषयांतर्गत शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांची बहुभाषिकता जागरुकता तपासण्यासाठी तयार करण्यात आलेली आहे. संशोधनाचा विषय शिक्षणशास्त्र विद्यार्थ्यांची बहुभाषिकता जागरुकता तपासणे असा आहे. संशोधन विषयाला अनुसरून आपणाकडे संशोधनाची पदनिश्चयन श्रेणी देत आहे . आपण दिलेल्या प्रतिसादावर संशोधनाची यशस्विता अवलंबून आहे . तरी कृपया सर्व विधानांना योग्य प्रतिसाद देऊन सहकार्य करावे ही विनंती .

**संशोधक**

शाम बाबुराव रणदिवे

...........................................................................................................

............................................................

**अभ्यास केंद्र**

ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील, पुणे-51

**पदनिश्चयन श्रेणी भरण्यापूर्वी सूचना**

1. पदनिश्चयन श्रेणीतील सर्व विधानांना प्रतिसाद द्या.
2. आपणास योग्य वाटणाऱ्या पर्यायाच्या चौकटीत अशी √ खूण करा.
3. आपण व्यक्त केलेल्या मतांचा उपयोग संशोधना पुरता मर्यादित असेल.
4. आपल्या माहितीची व नावाची गुप्तता राखली जाईल.

**सर्वसामान्य माहिती**

विद्यार्थी शिक्षकाचे नाव.......................................................................................

अध्यापन पद्धती...............................................................................

महाविद्यालयाचे नाव व पत्ता ..........................................................................................

शिक्षण.................................................................................................

मो . क्रमांक................................ ई-मेल आयडी.................................

| **अ.क्र** | **विधान** | **नेहमीच (5)** | **बहुधा (4)** | **गरजेनुसार (3)** | **क्वचीत (2)** | **कधीच नाही (1)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **भाषिक** | | | | | |
| 1 | आपण अन्य भाषिकांशी संवाद साधता. | | | | | |
| 2 | विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करताना आपण एका भाषा बरोबर दोन किंवा अधिक भाषांचा वापर करता. | | | | | |
| 3 | आपण एका भाषेबरोबर दोन किंवा अधिक भाषा बोलता. | | | | | |
| 4 | आपण एका भाषेबरोबर दोन किंवा अधिक भाषांमध्ये लेखन करता. | | | | | |
| 5 | आपणास येत असणाऱ्या भाषा सोडून इतर भाषा शिकण्याची आवड वाटते. | | | | | |
| | **साहित्यिक/ व्यवहारिक** | | | | | |
| 6 | आपल्या महाविद्यालयात विविध भाषा व विविध बोली बोलणाऱ्या तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन केले जाते. | | | | | |
| 7 | विविध भाषांच्या ध्यानामुळे विद्यार्थ्यांची कल्पकता व नवनिर्मितीची क्षमता वाढते. | | | | | |
| 8 | बहुभाषेतील साहित्याचे वाचन करावे यासाठी आपणास प्रोत्साहन मिळते. | | | | | |
| 9 | आपण बहुभाषेतील भाषांतरित साहित्याचे | | | | | |

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

| | | |
|---|---|---|
| | वाचन करता. | |
| 10 | आपण विविध भाषिक साहित्यिकांचा समप्रमाणात आदर करता. | |
| | | |
| | **सांस्कृतिक** | |
| 11 | बहुभाषी व्यक्तींमध्ये अन्य संस्कृतीविषयी आदराची भावना उच्च दर्जाची असते. | |
| 12 | आपण विविध भाषेतील गाणी ऐकता. | |
| 13 | आपण विविध भाषेतील चित्रपट पाहता. | |
| 14 | आपण अन्य भाषिकांच्या सण समारंभामध्ये सहभागी होता. | |
| 15 | बहुभाषिकतेमुळे अन्य राज्य व देशातील व्यक्तींचे तसेच संस्कृतींचे आकलन चांगल्याप्रकारे होते. | |
| | **सामाजिक** | |
| 16 | आपण अन्य भाषिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेता. | |
| 17 | विविध स्तरावरील पाठ्यपुस्तके तयार करताना विद्यार्थ्यांच्या बोलीभाषांचा विचार व्हावा असे आपणास वाटते. | |
| 18 | बहुभाषी व्यक्तींचे मानवी संबंध सकारात्मक व उच्च दर्जाचे असतात. | |
| 19 | सामाजिक सुसंवाद व एकोपा यासाठी बहुभाषिकता उपयोगी ठरते. | |
| 20 | बहुभाषिकतेमुळे सामाजिक समस्येवर उपाय शोधणे सोपे होते. | |
| | | |
| | **राजकीय** | |
| 21 | बहुभाषिकतेमुळे राजकीय समस्या दूर करता येतात. | |
| 22 | बहुभाषिक व्यक्ती राजकीय जीवनात यशस्वी ठरते. | |
| 23 | बहुभाषिक व्यक्तीचे राजकीय संबंध सकारात्मक स्वरूपाचे असतात. | |
| 24 | बहुभाषिकतेमुळे राजकीय घडामोडी चांगल्या प्रकारे समजतात. | |
| 25 | बहुभाषिकतेमुळे लोकशाहीतील सार्वजनिक सेवा सुविधांची माहिती लवकर उपलब्ध होते. | |

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

| | | |
|---|---|---|
| | **शैक्षणिक** | |
| 26 | आपण विद्यार्थ्यांच्या भिन्न बोली भाषा समजून घेण्याचा प्रयत्न करता. | |
| 27 | बहुभाषिकतेवर आधारीत आपल्या महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. | |
| 28 | आपण विविध भाषेतील गमती जमती व सूक्ष्म साम्य , भेद समजून घेण्याचा प्रयत्न करता. | |
| 29 | बहुभाषिकतेमुळे शब्दाचा , वाक्याचा अर्थ समजून घेण्याच्या क्षमतेत वाढ होते | |
| 30 | बहुभाषिकतेमुळे शब्दाचा , वाक्याचा अर्थ समजून घेण्याच्या क्षमतेत वाढ होते | |

| | | |
|---|---|---|
| | **व्यवसायिक** | |
| 31 | बहुभाषिकतेमुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात | |
| 32 | आपण अनोळख्या ठिकाणी तसेच प्रवासात बहुभाषेतील पाट्या , सूचनांचे वाचन करता | |
| 33 | विविध उत्पादनांच्या वेष्टनावर दिलेल्या बहुभाषेतील सूचनांचे आपण वाचन करता | |
| 34 | बहुभाषिकता व्यापार वृद्धीसाठी उपयोगी ठरते | |
| 35 | बहुभाषिकतेमुळे व्यवसायातील आधुनिक व्यवस्थापन व मार्केटिंग तंत्राची माहिती होते | |

## संदर्भ

*Annamalai, E. (2001). **Managing Multilingualism in India: Political and Linguistic Manifestation**. New Delhi: Sage Publication.*
*Best, J.W.& kahn, J.V.(2012). **Research in Education**(10th ed.).New Delhi;PHI Learning Private LTD.*
*घोरमोडे, के .आणि घोरमोडे ,क. (२००८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, (प्रथमावृत्ती ).विद्या प्रकाशन .*
*पाटील, बी. , कागदे, एस. , कुऱ्हाडे, एस. आणि तोटे, क. (2016). भाषा, ज्ञान आणि अभ्यासक्रम (प्रथमावृत्ती ).निराली प्रकाशन.*
*पांडे, अ. आणि हरी वि. (२०१८). बहुभाषिकता : गुवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया (प्रथमावृत्ती). युनिक अकॅडमी पब्लिकेशन.*
*पारसनीस, हे. (2006). शैक्षणिक संशोधन, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*